# संविधान सभेतील महिला






# सरोजिनी नायडू

(13 फेब्रुवारी 1879 – 2 मार्च 1949 । हैद्राबाद, आंध्र प्रदेश)

1914 मध्ये सरोजिनी नायडू गांधीजींना इंग्लंडमध्ये भेटल्या आणि त्यांच्या विचारांनी प्रभावित होऊन स्वातंत्र्य चळवळीत सामील झाल्या. 1925च्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेस अधिवेशनाच्या त्या पहिल्या भारतीय महिला अध्यक्ष होत्या. स्त्रियांनी दांडी सत्याग्रहात भाग घेण्यापेक्षा पाठी राहून जखमी सत्याग्रहींची देखभाल करावी, असे गांधीजींनी ठरवले. हे समजल्यावर त्या गांधीजींना म्हणाल्या, **“सत्याग्रहींची देखभाल तर आम्ही जरूर करू. पण आम्ही सत्याग्रहात भाग घेऊन देशासाठी बलिदान करण्यासाठी आलो आहोत. आम्हाला त्या ध्येयापासून वंचित करणे हा अन्याय आहे.”** शेवटी गांधीजींना स्त्रियांचे म्हणणे मान्य करावेच लागले.

हिंदू-मुस्लिम एकता आणि महिलांना पुरुषांच्या बरोबरीने कामाचा अधिकार आणि त्यांचे स्वातंत्र्य देशाच्या भवितव्यासाठी आवश्यक बाब आहे, यावर त्यांचा भर होता. 1918च्या काँग्रेसच्या विजापूर अधिवेशनात त्या आपल्या भाषणात म्हणतात – **नागरिकत्वाच्या अधिकारांची चर्चा करताना ‘पुरुष’ शब्दासोबत ‘स्त्री’ हा शब्द असायलाच हवा.** 1946 साली बिहारमधून त्या संविधानसभेवर निवडल्या गेल्या. फाळणी, राष्ट्रध्वज इ. महत्त्वाच्या विषयांवरील चर्चेत त्यांनी सहभाग घेतला. पुढे त्यांची उत्तर प्रदेशच्या राज्यपालपदी नेमणूक झाली. सुरुवातीला अनिच्छा असूनही त्यांनी पद स्वीकारले व त्या म्हणाल्या, “तुम्ही जंगली पक्षाला पिंजऱ्यात बंद करत आहात.”




# दुर्गाबाई देशमुख

(15 जुलै 1909 – 9 मे 1981 | राजमुंदरी, आंध्रप्रदेश)

वयात येईपर्यंत त्या सामाजिक-राजकीय चळवळीत सक्रिय झाल्या. वयाच्या 12व्या वर्षी त्यांनी देवदासींचा प्रश्न हाती घेतला. 15 वर्षांच्या झाल्यावर विवाहाचा अर्थ उमगताच त्यांनी लग्नातून मुक्त होऊन स्वतःला सार्वजनिक जीवनासाठी वाहून घेण्याचा निर्णय घेतला आणि आपण योग्य पत्नी होऊ शकणार नाही, असे पतीला सांगितले. पुढे कायद्याचे शिक्षण घेऊन त्यांनी महिलांच्या हक्कांसाठी आवाज उठवला. असहकार चळवळीत त्यांना अनेकदा तुरुंगवास झाला. मद्रास येथील 'मीठ सत्याग्रहा'त त्यांना 3 वर्षांचा तुरुंगवास झाला. **तुरुंगातील कैद्यांच्या अ, ब, क या श्रेणी त्यांना खटकत. आपली विशेष सुविधा असलेली 'अ' श्रेणी बदलून 'क' द्यावी अशी त्यांनी न्यायाधीशांना विनंती केली.**

वयाच्या 37व्या वर्षी मद्रास प्रांतातून संविधानसभेवर त्या निवडून आल्या. संविधानसभेत त्यांची नियमित उपस्थिती व सक्रिय सहभाग होता. **त्यांनी संविधानसभेत सुमारे 750 दुरुस्त्या सुचवल्या.** भाषा, धर्मस्वातंत्र्य, राज्यसभेतल्या सदस्यत्वासाठीची वयोमर्यादा, न्यायालयांची भूमिका, न्यायाधीशांची निवड आणि न्यायव्यवस्थेची स्वायत्तता अशा अनेक विषयांवर त्यांनी संविधानसभेतल्या चर्चांत हस्तक्षेप केला. मुलींना संपत्तीत अधिकार देणाऱ्या हिंदू कोड बिलाच्या त्या कडव्या समर्थक होत्या. **कौटुंबिक खटल्यांसाठी स्वतंत्रपणे कुटुंब न्यायालयं असावीत यासाठी त्यांनी आघाडी उघडली.** पुढे त्यांच्या मृत्यूनंतर 1984 मध्ये अशी न्यायालयं सुरू करण्याबाबतचा कायदा संसदेनं संमत केला.




# हंसा मेहता

(3 जुलै 1897 – 4 एप्रिल 1995 । सुरत, गुजरात)

हंसाबेन लंडनमध्ये पत्रकारितेचा अभ्यास करण्यासाठी गेल्या असता, त्यांची सरोजिनी नायडूंशी ओळख झाली. सरोजिनीबाईंमुळेच त्या स्त्रियांच्या चळवळीकडे ओढल्या गेल्या. त्या परत आल्या ते राष्ट्रीय चळवळीत सामील होण्याचे ठरवूनच. **भारतीय महिला परिषदेच्या अध्यक्षपदी असताना त्यांनी स्त्रियांच्या अधिकाराची सनद तयार केली. त्या सनदेत स्त्री जीवनाशी सर्वस्पर्शी मुद्दे होते. हिंदू कोड बिल तयार करताना त्याचा उपयोग झाला, यावरून त्या सनदेचे महत्त्व लक्षात येते.**

1946 साली त्या मुंबई प्रांतातून संविधानसभेवर निवडून गेल्या. त्यांनी कळीचा मांडलेला मुद्दा होता – वैयक्तिक कायदे रद्द करून एकच एक धर्मनिरपेक्ष कायदा करणं. एकरुप नागरी संहिता. ती प्रगतीशील हवी याबद्दल त्या दक्ष आहेत. त्या म्हणतात – आपल्याला हवी असलेली (एकरुप नागरी) संहिता ही आताच्या वैयक्तिक कायद्यांच्या बरोबरीनं अथवा त्यांच्या पुढे असावी. अन्यथा ते प्रतिगामी पाऊल ठरेल. कोणालाच ते स्वीकारार्ह असणार नाही. हिंदू कोड बिलालाही त्यांनी पाठिंबा दिला. **1947 मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकार घोषणापत्रामधील ‘All men are born free’ या वाक्यात बदल करून ‘All human beings are born free’ हा शब्दप्रयोग करण्यास त्यांनी भाग पाडले. संविधानावरच्या लिखित प्रतीवरील त्यांची सही म्हणजे स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रियांच्या योगदानावर उमटलेली सुवर्णमुद्रा होय.**




# राजकुमारी अमृत कौर

(2 फेब्रुवारी 1889 – 2 ऑक्टोबर 1964 | लखनऊ, उत्तर प्रदेश)

राजकुमारी अमृत कौर या कपूरथळ्याची राजकन्या. इंग्लंडमध्ये शिक्षण पूर्ण झाल्यावर त्या भारतात परतल्या. तेव्हाच महात्मा गांधींचा वैचारिक प्रभाव त्यांच्यावर पडला. जालियनवालाबाग हत्याकांडानंतर त्यांना भारताला स्वातंत्र्याची गरज आहे याची तीव्र जाणीव झाली आणि स्वातंत्र्य चळवळीत त्यांनी भाग घेतला. महिलांची दयनीय अवस्था बघून 1927 मध्ये त्यांनी ‘अखिल भारतीय महिला संमेलना’ची स्थापना केली.

संविधान सभेत अनेक घटनात्मक तरतुदींना आकार देण्यात त्यांचा महत्त्वाचा वाटा राहिला. त्या विधानसभेच्या मूलभूत हक्क उपसमितीच्या आणि अल्पसंख्याक उपसमितीच्या प्रमुख सदस्य होत्या. **मूलभूत हक्क उपसमितीच्या बैठकांत त्यांनी धर्म पालनाच्या स्वातंत्र्याच्या समावेशास विरोध केला. त्यांच्या मते, यामुळे पडदा, सती, देवदासी या प्रथांना घटनात्मक संरक्षण मिळू शकते. त्यांच्या या विरोधाला यश आले. धर्मपालनाचं हे स्वातंत्र्य राज्याला सामाजिक सुधारणांसाठी कायदे करण्यापासून प्रतिबंधित करु शकणार नाही, अशी अट घालण्यात आली.** त्यांनी राज्यानं एकरुप नागरी संहिता तयार करण्याच्या बाजूनं मतदान केलं. मतदानात हा मुद्दा टिकला नाही. पण राज्याच्या धोरणासाठीच्या मार्गदर्शक तत्त्वांत त्याचा समावेश करण्यात आला. **स्वतंत्र भारताच्या त्या पहिल्या आरोग्यमंत्री होत्या. दिल्लीतील AIIMS ही त्यांचीच देणगी आहे.** महिला आणि हरिजनांच्या उद्धारासाठी काम केले पाहिजे, शिक्षण हे निःशुल्क आणि अनिवार्य असले पाहिजे, यावर त्यांचा जोर होता.




# दाक्षायणी वेलायुधन

(4 जुलै 1912 – 20 जुलै 1978 । एर्नाकुलम, केरळ)

वयाच्या 34व्या वर्षी निवडून गेलेल्या दाक्षायणी या **संविधान सभेतील सर्वात तरुण आणि एकमेव अनुसूचित जातीच्या महिला सदस्य होत्या.** त्यांना संविधान सभेतला स्वतंत्र आणि सशक्त आवाज मानला जाई. लोकप्रिय मताच्या विरोधात जाण्यास त्या घाबरत नसत. नेहरूंनी मांडलेल्या उद्दिष्टांच्या ठरावाच्या चर्चेत हस्तक्षेप करून त्यांनी संविधान सभेतली आपली पहिली तोफ डागली. संविधानसभेच्या पहिल्या बैठकीत त्या म्हणाल्या होत्या, **‘भविष्यात लोक कशा प्रकारचे जीवन जगतील हे राज्यघटनेवर अवलंबून असेल. मला आशा आहे की कालांतराने या देशात असा एकही समुदाय शिल्लक राहणार नाही ज्याला अस्पृश्य म्हटले जावे’.**

समुदाय आणि राज्य यांचे संबंध नियमित करण्यापलीकडं राज्यघटनेचं अधिक महत्त्वाचं कार्य एकूण समाजाचं पुनर्घटन करणं आहे, असं त्यांनी आपल्या पहिल्या भाषणात नोंदवलं. भारतानं कोणत्या प्रकारचा संघराज्यवाद स्वीकारला पाहिजे यावर त्यांचं ठाम मत होतं. 1948च्या भारतीय संविधानाच्या मसुद्यात विकेंद्रीकरणाचा अभाव आणि राज्य सरकारांवर केंद्राची मजबूत पकड ठेवण्यात आल्याची त्यांची टीका होती. केंद्रानं राज्यांच्या प्रमुखपदी राज्यपाल नेमणं हे केंद्राची राज्यांवर वर्चस्व ठेवण्याची ताकद वाढवण्याचाच प्रकार आहे, असं त्यांनी मांडलं.




# कमला चौधरी

(22 फेब्रुवारी 1908 – 15 ऑक्टोबर 1970 | लखनऊ, उत्तरप्रदेश)

यांचा जन्म एका समृद्ध कुटुंबात झाला. पण घरातील साम्राज्यशाही एकनिष्ठांपासून दूर जाऊन त्या राष्ट्रीय समितीमध्ये सामील झाल्या. 1930 मध्ये म. गांधी यांनी सुरू केलेल्या ‘सविनय कायदेभंगा’च्या चळवळीत त्या सामील झाल्या. अनेकवेळा त्यांना तुरुंगवास झाला आहे.

हिंदू कोड बिलातील मुलींना मुलांइतका वारसा हक्क देणारी तरतूद पाश्चात्त्य संस्कृतीची असल्याचा आरोप झाला; मात्र त्या हे खोडून काढतात. हिंदू कोड बिलातील मुलींना मुलांइतका वारसा हक्क देणारी तरतूद पाश्चात्त्य संस्कृतीची असल्याचा आरोप झाला; मात्र कमला हे खोडून काढतात. त्या म्हणतात – **मुलींना बापाच्या संपत्तीत अधिकार नाकारणं हे अन्यायकारक आहे. पित्याच्या संपत्तीत मुलींना वारसा हक्क मिळणं हे कालसुसंगत असून आपल्या श्रद्धा आणि संस्कृतीशी अनुरुपच आहे. आपण उदार अंतःकरणानं हे समजून घ्यायला हवं.** घटस्फोट, द्विभार्या प्रतिबंध आणि मुलाप्रमाणे मुलीला वारसा हक्क देणाऱ्या हिंदू कोड बिलाला विरोध करताना मांडलेले मुद्दे आज तसेच कोणी मांडले तर आजच्या महिला खवळूनच उठतील. त्या म्हणतात – घटस्फोट ही भारतात नवी गोष्ट नाही. आपल्या पवित्र ग्रंथांनी त्यास मान्यता दिली आहे. कोणत्या स्थितीत, काय प्रकारे विभक्त व्हावं हे आपल्या शास्त्रांत नोंदवलेलं आहे. काळ बदलला हे खरं. पण काळ असा आपसूक बदलत नाही. डॉ. आंबेडकर, पं. नेहरु, कमला चौधरी आणि बाकी संविधान सभेतल्या महिला सदस्य तसेच इतरही पाठिंबा देणाऱ्या लोकांच्या हस्तक्षेपामुळे काळ बदलला आहे.




# अम्मु स्वामीनाथन

(22 एप्रिल 1894 – 4 एप्रिल 1978 । अन्नाकरा, केरळ)

कॅप्टन लक्ष्मी सहगल आणि मृणालिनी साराभाई या अम्मू स्वामिनाथन यांच्या कन्या. 14 वर्षांच्या अम्मूचे लग्न होत असताना त्यांनी काही अटी घातल्या, आपण मद्रासला स्थलांतरित व्हायचं. तिथं मला ब्रिटिश शिक्षिकेकडून इंग्रजी शिकवायचं. तिसरी अट आजही आपल्याला पचवणं कठीण होतं. त्या म्हणतात – **माझ्या भावांना विचारला न जाणारा प्रश्न मला विचारायचा नाही. तो म्हणजे – "घरी परत कधी येणार?"**

अम्मू स्वामीनाथन यांनी 1917 मध्ये ॲनी बेझंट, मार्गरेट, मालती पटवर्धन, श्रीमती दादाभाय आणि अंबुजमल यांच्या बरोबरीने 'महिला भारत संघ' तयार केला आणि महिलांचे संघटन उभे केले. महात्मा गांधींच्या प्रभावामुळे त्यांनी स्वातंत्र्यलढ्यात झोकून दिले. 1946 मध्ये मद्रास मतदारसंघातून त्या संविधान सभेचा भाग बनल्या. 24 नोव्हेंबर 1949 रोजी, संविधानाचा मसुदा मंजूर करण्यावर झालेल्या चर्चेदरम्यान, आशावादी आणि आत्मविश्वासपूर्ण अम्मू यांनी म्हटले, **'बाहेरून लोक म्हणतात की भारताने महिलांना समान अधिकार दिलेले नाहीत. आता आपण असे म्हणू शकतो की जेव्हा भारतीय लोकांनी स्वतःची राज्यघटना तयार केली तेव्हा त्यांनी महिलांना देशातील इतर नागरिकांसारखे अधिकार दिले आहेत.'** हिंदू कोड बिलाच्या विषयावर तात्पुरत्या संसदेत चर्चा सुरू झाली की काही पुरुष सदस्यांकडून होणारी शेरेबाजी स्त्रियांना दुय्यम लेखणारी असे. अम्मू अशांना धारेवर धरत.




# एनी मास्कारेन

(4 जुलै 1912 – 20 जुलै 1978 । एर्नाकुलम, केरळ)

त्रावणकोर राज्य काँग्रेसमध्ये सामील होणाऱ्या त्या पहिल्या स्त्री कार्यकर्त्या होत्या. उक्ती परखड, कृती निर्भीड, आक्रमक बाणा हे एनी मस्कारेन यांचं व्यक्तित्व. 1938 मध्ये स्वातंत्र्य चळवळीशी जोडल्या गेल्या. तसेच 1942 च्या ‘भारत छोडो’ आंदोलनात त्यांनी स्वतःला पूर्ण झोकून दिले. 1939 ते 1947 दरम्यान अनेकदा त्या तुरुंगात गेल्या, मात्र ब्रिटिश पोलीस अधिकारीही त्यांना वचकून असत. त्रावणकोर राज्याच्या एकीकरणाच्या चळवळीतील त्या एक नेत्या होत्या.

संविधान सभेतल्या निवडणुकांविषयीच्या चर्चेत भाग घेताना त्या म्हणतात – **‘आपण इथं लोकशाहीच्या पायाभूत तत्त्वांची रचना करत आहोत. ताबडतोबीनं येणाऱ्या निवडणुकांसाठी नव्हे; तर आगामी काळासाठी, पुढच्या पिढ्यांसाठी, राष्ट्रासाठी. म्हणूनच सोयीचं काय यापेक्षा नैतिक काय याचा विचार करणं अधिक उपयुक्त होईल. माझ्यासाठी राजकारण नैतिक आज्ञापत्र आहे.’** त्यांचा जोर हिंदू कोड बिलावर होता. हिंदू कोड बिल असे तयार झाले पाहिजे ज्यामुळे देशातील सर्व स्त्रियांना त्यांचे अधिकार मिळतील, असे त्यांचे मत होते. कायद्याच्या सखोल अभ्यासक असल्यानं जगातील विविध देशांतील घटनांचे संदर्भ त्यांच्या मांडणीत असत. संघराज्याच्या चर्चेवेळी ‘मजबूत केंद्रा’च्या बाजूनं त्यांनी भूमिका मांडली. व्यक्तीस्वातंत्र्याच्या कट्टर पुरस्कर्त्या असलेल्या एनींनी प्रतिबंधात्मक अटकेबाबतच्या कायद्याच्या प्रस्तावाला संसदेत कडाडून विरोध केला.




# बेगम ऐज़ाज़ रसूल

(2 एप्रिल 1909 – 1 ऑगस्ट 2001 । मलेरकोटला, पंजाब)

**संविधान समितीतील एकमात्र मुस्लिम महिला म्हणजे बेगम ऐज़ाज़ रसूल.** पंजाबमधील हिंदू-मुस्लिम ऐक्यासाठी प्रसिद्ध असलेल्या मलेरकोटला या गावात एका श्रीमंत जमीनदार कुटुंबात त्यांचा जन्म झाला. मुस्लिम लीगच्या सदस्या म्हणून त्या संविधान सभेत सामील झाल्या होत्या पण नंतर त्या काँग्रेसमध्ये सामील झाल्या. जरी त्यांचा जन्म जमीनदार कुटुंबात झाला असला तरी **जमीनदारी उन्मूलन व्हावे यासाठी त्यांचे प्रचंड समर्थन होते** आणि त्या त्यासाठी ओळखल्या जातात. त्या संविधान सभेतील अल्पसंख्याक हक्कांच्या मसुदा समितीच्या सदस्य होत्या. बैठकीत अल्पसंख्याकांच्या हक्कांवर झालेल्या चर्चेदरम्यान त्यांनी मुस्लिमांसाठी ‘स्वतंत्र मतदार संघ’ असण्याच्या कल्पनेला कडाडून विरोध केला. या शिवाय धर्माच्या आधारावर अल्पसंख्याकांसाठी प्रस्तावित आरक्षणालाही त्यांनी विरोध केला आणि त्या बदल्यात अल्पसंख्याकांना न्याय आणि समान हक्क मिळावेत, अशी मागणी केली.

या व्यतिरिक्त त्यांनी राष्ट्रभाषा, भारतीय लोकशाही आणि कॉमनवेल्थ, आरक्षण आणि मालमत्तेचे अधिकार यावरही आपले मत व्यक्त केले. हिंदी ही राष्ट्रभाषा मानली पाहिजे आणि ठरावीक काळानंतर अल्पसंख्याकांनीही देवनागरी भाषा शिकली पाहिजे, असे त्यांचे मत होते. खेळात त्यांना विशेष रुची होती. **भारतीय महिला हॉकी कपचे नाव त्यांच्या नावावरून दिले आहे.**




# पूर्णिमा बॅनर्जी

(1911 – 1951 । काल्का, पंजाब)

शिक्षणानंतर भारतात परतल्यावर राष्ट्रीय आंदोलन व महिला चळवळीत त्यांनी स्वतःला झोकून दिले. ट्रेड युनियन, शेतकरी सभा आणि ग्रामीण लोकांना दिशा दाखवत संघटित करण्याची जबाबदारी त्यांच्याकडे होती. ‘युनिफॉर्म सिव्हिल कोड’ या शब्दाला विरोध करून घटना समितीचे सभागृह त्यांनी दणाणून सोडले. ‘कॉमन सिव्हिल कोड’ या शब्दांचा आग्रह धरला. **स्त्रियांसंबंधीचे धोरण घटना समितीतच ठरले तर त्याला अर्थ राहील, नाही तर पुढे कायदे होतच राहतील, बदलतही जातील.** ‘हम भारत के लोग’ या मागची भूमिका स्पष्ट करताना त्या म्हणतात, की संविधानाची निर्मिती ही या मातीतल्या लोकांच्या श्रमातून झाली आहे विदेशी हुकूम गाजवणाऱ्यांनी केलेली नाही.

**संविधान आपल्याला काय देतं? या प्रश्नाला पूर्णिमा बॅनर्जी यांचं उत्तर होतं, ‘सामाजिक रचना बदलण्याची साधनं संविधान देतं.’** 24 जानेवारी 1950 ला ‘जन गण मन’ हे राष्ट्रगीत म्हणून अधिकृतपणे स्वीकारलं गेलं. त्या वेळी सभागृहात हे राष्ट्रगीत म्हणणाऱ्या संचाच्या प्रमुख होत्या पूर्णिमा बॅनर्जी. **धर्मनिरपेक्षतेविषयीचं त्यांचं मत समजून घेणं अत्यंत उद्बोधक आहे. भारताची धर्मनिरपेक्षता ही वेगळ्या प्रकारची आहे. ती धर्माला नकार देत नाही. तर सर्व धर्मांविषयी आस्था बाळगायला शिकवते.** **‘आपला शैक्षणिक अभ्यासक्रम देशातील वैविध्याचा, विविध मतांचा आदर बाळगणारा, आरोग्यदायी नागरिक घडवणारा असावा.’** फाळणीच्या धार्मिक विद्वेषी रक्तपाताच्या पार्श्वभूमीवर पूर्णिमा बॅनर्जी हे मत मांडत होत्या.




# रेणुका रे

(4 जानेवारी 1904 – 1997 । प. बंगाल)

वयाच्या 16 व्या वर्षी गांधीजींना भेटल्यानंतर रेणूका रे ह्यांच्या आयुष्यात मोठा बदल झाला. 1934 मध्ये त्या 'अखिल भारतीय महिला काउन्सिल'च्या सदस्य बनल्या. 1943 ते 1946 पर्यंत त्या केंद्रीय विधानसभा, संविधानसभा आणि हंगामी संसदेच्या सदस्य होत्या. 1934 मध्ये अखिल भारतीय महिला परिषदेत काम करत असताना, त्यांनी भारतीय महिलांच्या स्थितीवर महत्त्वपूर्ण अभ्यास केला. भारतीय महिला जगात सर्वाधिक शोषित स्थितीत असल्याचा त्यांचा अहवाल होता.

त्यांनी महिला आणि मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी सतत काम केले. त्यासाठी वेगळा आयोग असला पाहिजे अशी त्यांची मागणी होती. त्या नियोजन आयोगाच्या सदस्याही झाल्या. हिंदू कोड बिलाच्या बाजूनं त्या ठाम उभ्या राहिल्या. पुढे पहिल्या लोकसभेत ते टप्प्याटप्प्यानं मंजूर झालं. त्या वेळी रेणुका प. बंगाल सरकारात मंत्री होत्या. **संसदेनं सामाजिक कल्याण आणि मागासवर्ग कल्याण यांचा अभ्यास करण्यासाठी समिती नेमली. तिच्या अध्यक्ष त्या होत्या. 'रेणुका रे समिती' या नावानं ही समिती ओळखली जाते.** या समितीनं अनेक महत्त्वाच्या सूचना केल्या. **'जर मी आता तरुण असते आणि गांधीजींसारख्यांचं मार्गदर्शन मिळालं नसतं, तर बहुधा मी नक्षलवाद्यांत सामील झाले असते.'** गांधीयुगाच्या आपल्या आठवणी सांगताना 1970 मध्ये त्या हे लिहितात.




# विजयालक्ष्मी पंडित

(18 ऑगस्ट 1900 – 1 डिसेंबर 1990 । अलाहाबाद, उत्तरप्रदेश)

विजयालक्ष्मी पंडित या पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या भगिनी. त्यांच्या राजकीय जीवनास गांधीजींचा विचारातून प्रेरणा मिळाली आणि असहकाराच्या चळवळीपासून सुरुवात झाली. 1932 ते 1933, 1940 आणि 1942 ते 1943 मध्ये इंग्रजांनी त्यांना तीन वेगवेगळ्या तुरुंगात डांबले होते. नेहरूंबरोबर त्या राजकारणात सक्रिय होत्या.

1946 मध्ये संविधान सभेत त्यांची निवड झाली. तिथे महिलांच्या समानतेच्या मुद्द्यांवर त्यांनी आपले मत मांडून कामे करून घेतली. **महिलांना त्यांच्या पती आणि पित्याच्या संपत्तीत उत्तराधिकारी म्हणून हिस्सा मिळाला पाहिजे. हे एक मोठे आव्हान आहे आणि ते स्त्री-पुरुष एकत्र येऊनच पेलू शकतात, असे त्यांचे म्हणणे होते.** आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची बाजू मांडण्याच्या, शिष्टाई करण्याच्या जबाबदाऱ्या विजयालक्ष्मींवर येत गेल्यानं त्यांना बराच काळ परदेशी राहावं लागे. मॉस्को, मेक्सिको आणि वॉशिंग्टन येथे राजदूत म्हणून त्यांनी काम केलं. **1953 मध्ये त्या संयुक्त राष्ट्रांच्या सर्वसाधारण सभेच्या पहिल्या महिला अध्यक्ष झाल्या.** एक वर्षानंतर त्यांनी एकाच वेळी इंग्लंड आणि आयर्लंडमध्ये राजदूत म्हणून काम केलं. 1964 ते 1968 पर्यंत त्या लोकसभेत खासदार राहिल्या. त्यानंतर सक्रिय राजकारणातून त्या निवृत्त झाल्या. **मात्र जेव्हा देशात आणीबाणी लागू झाली त्यावेळी त्यांनी उघडपणे आपली भाची इंदिरा गांधी यांच्या विरोधात भूमिका घेतली.**




# सुचेता कृपलानी

(25 जून 1908 – 1 डिसेंबर 1974 | अंबाला, हरियाणा)

सुचेता कृपलानी ह्या स्वतंत्र भारतातील पहिल्या महिला मुख्यमंत्री होत्या. त्या स्वातंत्र्यलढ्यातील सक्रिय नेत्या होत्या. त्यासाठी त्यांनी अनेकदा तुरुंगवास भोगलाय. ‘भारत छोडो’ आंदोलना दरम्यान ब्रिटिश सरकारने सर्व पुरुष नेत्यांना अटक करून तुरुंगात पाठवले होते, तेव्हा त्यांची भूमिका होती की **मी जर बाकीच्यांप्रमाणे तुरुंगात गेले तर आंदोलन कोण पुढे नेणार? त्यामुळे त्यांनी 1942 ते 1944 पर्यंत स्वातंत्र्यलढ्यासाठी भूमिगत राहून आंदोलन केले.**

1947च्या एप्रिल महिन्यात त्या संविधान सभेवर संयुक्त प्रांतातून निवडून जातात. स्वातंत्र्यानंतर जेव्हा फाळणीची दंगल उसळली तेव्हा त्यांनी महात्मा गांधींसोबत उसळलेला जनक्षोभ सावरण्याचे काम केले. मात्र फाळणीमुळे विस्थापित झालेल्यांच्या पुनर्वसनात व्यग्र राहिल्यानं संविधानसभेच्या कामकाजात पुरेशी भागिदारी त्या करू शकल्या नाहीत. हिंदू कोड बिलाला मात्र त्यांनी जोरदार पाठिंबा दिला.

एकरुप नागरी संहितेच्याही त्या समर्थक होत्या. महिलांबाबत त्या विशेष संवेदनशील होत्या. भारतीय संविधानात महिलांच्या हक्कांसाठी त्यांनी आवाज उठवला. स्वातंत्र्यानंतर त्यांनी सक्रिय राजकरणात प्रवेश केला. 1940 मध्ये अखिल भारतीय महिला काँग्रेसची स्थापना केली. **देशातल्या पहिल्या महिला मुख्यमंत्री होण्याचा मान सुचेता कृपलानींना जातो.**




# लीला रॉय

(2 ऑक्टोबर 1900 – 11 जून, 1970 । गोलपाडा, आसाम)

लीला रॉय यांचे वडील स्वातंत्र्य आंदोलनाचे हितचिंतक होते. 1923 मध्ये यांनी आपल्या मैत्रिणींच्या बरोबरीने बंडखोर अशा ‘दिपाली’ संघाची स्थापना केली; जिथे राजकीय गोष्टींवर चर्चा होत असत. 1926 मध्ये त्यांनी ढाका आणि कलकत्ता येथेही विद्यार्थिनींच्या ‘छातरी’ संघाची स्थापना केली. 1937 मध्ये त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आणि बंगाल महिला प्रांतीय काँग्रेसची स्थापना केली.

लीला रॉय यांची संविधान सभेत सदस्य म्हणून निवड झाली. काही काळात स्वातंत्र्य मिळणार पण देशाची फाळणी होणार हे नक्की झालं. त्यांचं मूळ गाव ढाका पाकिस्तानात जाणार होतं. यामुळे त्या खूप अस्वस्थ झाल्या. फाळणीचा निषेध म्हणून त्यांनी संविधानसभेचा राजीनामा दिला. यानंतर फाळणीनंतरच्या भयंकर उत्पातात सापडलेल्यांसाठीच्या मदतकार्याला त्यांनी वाहून घेतलं. **नोआखलीत दंगली शमवण्यात गांधीजींबरोबर त्याही सहभागी होत्या. 1947 मध्ये भारत पाकिस्तान फाळणीवेळी नौखाली दंगलीत अडकलेल्या 400 महिलांची त्यांनी सुटका केली.** त्यानंतर त्या सुभाषचंद्र बॉस यांच्या फॉरवर्ड ब्लॉकच्या सदस्य झाल्या. लिंगाधारीत सामाजिक-राजकीय कार्यात स्त्रिया पुरुषांपेक्षा कुठेही कमी पडत नाहीत, हे त्यांनी सिद्ध केले.




# मालती चौधरी

(26 जुलै 1904 – 15 मार्च 1998 | कलकत्ता, प. बंगाल)

त्यांच्यावर गांधीजींच्या विचारांचा पगडा असल्यामुळे त्यांनी त्यांच्या पतीसमवेत मिठाच्या सत्याग्रहात उडी घेतली. त्यांना अटक करून तुरुंगात टाकले तेव्हा त्या दोघांनी तुरुंगात कैद्यांना शिकवायला सुरुवात केली. आंदोलन सामान्य लोकांपर्यंत पोहोचावे, त्यांनीही त्यात सहभागी व्हावे यासाठी त्या सामान्य लोकांबरोबर सतत संवाद साधत असायच्या. गांधीजींचे काही चुकले तर मालती त्यांना स्पष्ट शब्दात सांगायच्या, **“बापू आपण हे ठीक केले नाही.”** आणि गांधीजींच्याही चूक लक्षात येताच ते त्यांच्या पुढे क्षमा मागण्यासाठी उभे राहायचे.

**ग्रामविकासासाठी प्रौढ शिक्षण अत्यावश्यक आहे शिवाय आदिवासी आणि अनुसूचित जाती-जमाती यांच्या विकासाकडे विशेष लक्ष देणे यावर संविधानसभेत त्यांचा अधिक जोर होता**. संविधान तयार करण्यात आपण मौलिक भागिदारी करू शकणार नाही. आपली उपयुक्तता प्रत्यक्ष लोकचळवळींत अधिक आहे, हे त्यांना कळून चुकलं. त्यांनी लागलीच संविधानसभेचा राजीनामा दिला आणि फाळणीच्या निर्णयानं उसळलेल्या दंगली शमवायला नोआखलीत दाखल झाल्या. गांधीजी नोआखलीत मुक्कामच ठोकून होते. आधी त्यांनी मालती चौधरींना तिथं यायला मनाई केली. त्यांनी कळवलं – **‘इथली परिस्थिती अत्यंत संवेदनशील आहे. बाहेरचं कोणी येण्यानं ती अधिक चिघळण्याची भीती आहे. सबब, तुम्ही आहात तिथंच थांबा. तीच नोआखलीसाठी मदत होईल.’** पण थोडं थांबून मालती नोआखलीत पोहोचल्याच. त्यानंतर तिथं त्यांनी जे काम केलं त्याचा झपाटा पाहून खुद्द गांधीजी त्यांचं वर्णन करतात – ‘तूफानी..!’